**महत्त्वाचे**

जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१६ 7519
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१
दिनांक:- १८/११/२०१६

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षणाधिकारी (माध्य), सर्व जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.

**विषय :- संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनमान्य टंकलेखन/ लघुलेखन संस्थांना शासनमान्यता देणेबाबत.( चौथा टप्पा)**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. एसपीई-१०१२/(१०८/१२) साशि-१,दि. ३१ ऑक्टोंबर २०१३.
२.शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/ प्र.क.-७३/एसडी-२, दि. २८ ऑगस्ट २०१४.
३. शासन शुध्दीपत्र क्रमांक :- संकीर्ण-२० १५/प्र.क्र.-११६/एसडी-२,दि. ३०/०९/२०१५.
४. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४६५२, दि. १६/०६/२०१५.
५. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४७४९, दि. २०/०६/२०१५.
६. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/४९०७, दि. २५/०६/२०१५.
७. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/९७२५, दि. २१/११/२०१५.
८. परिषदेचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१५/९७२५, दि. १२/०६/२०१६.

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, राज्यातील शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन वाणिज्य संस्थांमध्ये संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता आवश्यक संगणक सेटअपची माहिती भरण्याकरिता उर्वरित संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर नमुना फार्म क्र. २ उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरची लिंक दि. १८/११/२०१६ पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संस्थामार्फत भरल्या जाणाऱ्या सदर संगणक सेटअपची माहिती व त्यानुसार अपलोड करण्यात आलेल्या कागदपत्रांची लिंक आपणास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार संस्थांनी भरलेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याची खात्री करण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी सदर प्रस्ताव ३ प्रतीत स्विकारुन त्या तात्काळ छाननी व प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल शिफारशीसह सदर प्रस्तावाच्या २ प्रती विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावयाचे आहेत.

शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी आपल्या जिल्हयातून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संख्येनुसार संस्थांची तपासणी करण्यासाठी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी तसेच शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या मदतीने करण्यासाठीचे नियोजन करावे. संस्था तपासणीकरीता त्या-त्या तालुक्याचे डाटा ऐंट्री ऑपरेटर किंवा संगणक तज्ञ यांच्यासह करण्यासाठी आपल्या स्तरावरुन त्यांना आदेश देण्यात यावे.

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची तात्काळ छाननी करुन व खात्री करुनच संगणक संस्थांच्या परिपूर्ण प्रस्तावांना जिल्हानिहाय कॅम्प घेऊन मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१.**

प्रत:- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :- सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था, महाराष्ट्र राज्य.

C:\Documents and Settings\NET\Desktop\GCC-TBC Letter.doc